ई महा भूमि

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य.
दूसरा व तिसरा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, कॅम्प, पुणे -०१
**दूरध्वनी क्र. ०२०-२६१३७११०** **Email ID :statecordinatormahaferfar@gmail.com**
**Web site :** https://mahabhumi.gov.in

---

**क्र.रा.भू.अ.आ.का.४/ मा.सु. / २१३ /२०२१** **दिनांक : २१ .१.२०२२**

**प्रति,**

**विभागीय आयुक्त (सर्व)**
जिल्हाधिकारी **(सर्व)**

**विषय- ई चावडी प्रणालीच्या अंमलबजावणी साठी पूर्वतयारी करणे बाबत**

महोदय,

आपल्या सर्वांचे पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली आणि क्षेत्रीय कर्मचारी व महसूल अधिकारी यांचे अथक प्रयत्नातून ई-फेरफार प्रणालीत संगणकीकृत अधिकार अभिलेखामध्ये बहुतांश अचूकता प्राप्त करण्यात आपल्याला यश आले आहे. आता हाच ई-फेरफार प्रणालीचा डेटाबेस वापरून तलाठी दप्तराचे (सर्व गाव नमुने) संगणकीकृत करून जमीन महसूल सह सर्व देय शासकीय कर व उपकर निश्चित करून ते ऑनलाईन भरण्याची सुविधा खातेदार नागरिकांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. सध्या ई चावडी प्रणालीसाठी ची आज्ञावली विकसित करण्यात येत असून लवकरच त्याची वापरकर्ता चाचणी (UAT) करण्यात येणार आहे त्यासाठी खालील प्रमाणे पूर्व तयारी क्षेत्रीय स्थरावर करण्यात यावी.

१. **संगणकीकृत झालेले गाव नमुने वगळता इतर सर्व हस्तलिखित गाव नमुने अद्यावत करण्यात यावेत.**
२. **संगणकीकृत ७/१२ विसंगती दूर करून सर्व अधिकार अभिलेख अचूक करण्यात यावेत.**
३. **संगणकीकृत ७/१२ वरील जमीन महसूल व अकृषक जमीन महसूल आकारणी अद्यावत करावी.**
४. **जिल्हाधिकारी स्थरावर अधिसूचित केलेले सुधारित अकृषक प्रमाण दराप्रमाणे अकृषक ७/१२ वरील अकृषक आकारणी अद्यावत करण्यात यावी म्हणजे एकूण जमीन महसूल आकारणी योग्यरीत्या होईल.**
५. **इनाम पत्रक (गाव नमुना नं.३) मधील दुमाला जमिनीच्या जुडी किंवा विशेष आकारणीच्या नोंदी संगणकीकृत ७/१२ वर अद्यावत करण्यात याव्यात.**
६. **या महसूल वर्षाची खरीप, रब्बी, उन्हाळी व संपूर्ण वर्ष या हंगामातील बागायती पिके व नगदी पिकांची खातेनिहाय पिक पाहणी पूर्ण करावी म्हणजे शिक्षणकर, रोहयो उपकर व वाढीव शिक्षणकराची आकारणी योग्य होईल.**

७. प्रत्येक तालुक्यातील वर्ग १ ची गावे (१० पैसे /चौ.मी. अकृषक आकारणी असलेली) व वर्ग २ ची महसुली गावे (५ पैसे /चौ.मी. अकृषक आकारणी असलेली) निश्चित करून ई-फेरफार प्रणालीत मार्क करणे.
८. प्रत्येक तालुक्यातील ग्रामीण गावे, नगर पालिका हद्दीतील व मनपा हद्दीतील महसूल गावे निश्चित करून ई फेरफार प्रणालीत मार्क करणे.
९. मागील वर्षाची जमाबंदी पत्रके व तालुका नमुने १ ते ५ अद्यावत करून तहसीलदार यांनी तपासून प्रमाणित करणे व थकबाकीदार यांची यादी तपासून प्रतीस्वक्षारीत करणे.
१०. तलाठी साजा व महसूल मंडळ पुनर्रचना ई फेरफार प्रणालीत अद्यावत करणे.
११. गावातील सर्व गाव नमुना नं. ७/१२ साठी योग्य भूधारणा व उप भूधारणा निवडलेली आहे ह्याची खात्री करावी विशेषता दुमाला / इनाम जमीन बाबत खात्री करावी या बाबत भूधारणेचे चारही अहवाल तपासावेत.
१२. समान नावांची खाती एकत्रित करणे आवश्यक आहेत तसेच खातेदार यांचे नावातील चुका / स्पेलिंग चुका मुळे एकाच खातेदाराची एकाच गावात अनेक खाती तयार झाली असल्यास त्यांची नावे दुरुस्त करून समान नावे करावीत व त्यानंतर समान नावांचे खाते एकत्रीकरण करावे तरच ई चावडी प्रणालीत जमीन महसूल मागणी योग्य प्रकारे व अचूक रित्या निश्चित होईल.
१३. गाव नमुना न.७/१२ मधील इतर हक्क रकान्यातील इतर वारसांची नावे कब्जेदार सदरी घेण्याची कार्यवाही विहित प्रक्रिया पारपाडून पूर्ण करावी.
१४. शासन आदेशांप्रमाणे शेतीची स्थानिक जातीवाचक नावे विहित प्रक्रियेने बदलण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

वरील प्रमाणे **अभिलेख अचूकरीत्या अद्यावत करण्यासाठी क्षेत्रीय स्थरावर विशेष मोहीम घेण्यात यावी** तरच ई चावडी प्रणालीचा वापर योग्यरीत्या होईल. सदरच्या सूचना सर्व वापरकर्ते यांच्या निदर्शनास आणाव्यात व ही कार्यवाही मार्च अखेर पूर्ण करून घ्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

**(एन.के.सुधांशू)**
**जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख (म.रा,), पुणे**

प्रत,

**मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई३२ यांना महातीसाठी**